**Note # 1**

सादर,

विषय :- मे. सिताराम ट्रॅव्हल्स मालक प्रो. महेश रघुनाथ महाजन यांचा अकस्मात मृत्यु झाल्याने त्यांच्या नावी असलेली मनपाची निविदा श्री. रोहन महेश महाजन (मुलगा) यांच्या नावी करणेस मान्यता देणेबाबत.

संदर्भ :- श्री. रोहन महेश महाजन यांचा ई-ऑफिस व्दारे प्राप्त झालेला E-2261540 दि. 05/07/2024 रोजीचा अर्ज.

मिरा भाईदर महानगरपालिकेकरिता इंधनासह खाजगी वाहने वाहनचालकासह संपुर्ण सेवा भाडयाने घेणेकामी मे. सिताराम ट्रॅव्हल्स मालक प्रो. महेश रघुनाथ महाजन यांचा अकस्मात मृत्यु झाल्याने त्यांच्या नावी करणेकामी वरील संदर्भिय विषयान्वये अर्ज प्राप्त झालेला आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेकरिता अधिकारी वर्ग 01 व वर्ग 02 तसेच विविध विभागाच्या मागणी अन्वये इंधनासह खाजगी वाहने वाहनचालकासह पुरवठा करणेकामी निविदा मनपाच्या अधिकृत संकेतस्थळ http://www.mahatender.gov.in वर मागविणेकामी मा. निविदा समितीची दि. 21/11/2023 व मा. आयुक्त यांनी दि. 04/12/2023 रोजीने मंजुरी प्राप्त झाल्याने सदरील निविदा वृत्तपत्रात प्रासिध्द करून सदरील निविदेची संपुर्ण प्रक्रिया पुर्ण करून मा. प्रशासकिय सभा दि. 01/03/2024 रोजीने मे. सिताराम ट्रॅव्हल्स यांची निविदा वाटाघाटीअंती सादर केलेल्या दराने स्विकारण्यास करारनामा करून कार्यादेश देण्यास व त्याकामी येणाऱ्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 73 ( C ) नुसार मान्यता देऊन ठराव पारित केल्यानंतरच ठेकेदार मे. सिताराम ट्रॅव्हल्स यांच्याशी दि. 14/03/2024 रोजीने करारनामा करून मनपा/वाहन/218/2023-24 दि. 11/03/2024 रोजीने कार्यादेश देण्यात आलेला आहे.

मे. सिताराम ट्रॅव्हल्स यांचे मालक प्रो. महेश रघुनाथ महाजन हे होते. परंतु त्यांचा कॅन्सर या रोगाने दि. 17/06/2024 रोजी अकस्मात निधन झालेले आहे. त्यांच्या पश्चात त्यांना बायको, मुलगी व एक मुलगा आहे.

प्रो. महेश रघुनाथ महाजन, वय वर्ष 49 यांनी त्यांचा मुलगा श्री. रोहन महेश महाजन यांच्या समवेत दि. 24 मे 2024 रोजीने POWER OF ATTORNEY व दि. 12 एप्रिल 2024 रोजीने WILL करून सर्व मालमत्तेचे तसेच उदयोग धंदयाचे अधिकार प्रदान केलेले आहेत. श्री. रोहन महाजन यांनी खालील नमुद केलेली कागदपत्रे सादर केलेली आहेत व उक्त मनपाचे कंत्राट हस्तांतर करून मिळणेबाबत विनंती केली आहे.

1. मे. सिताराम ट्रॅव्हल्स या नावी असलेले उदयय आधार एम.एस.एम.ई. प्रमाणपत्र.
2. आधारकार्ड व पॅनकार्ड
3. जी.एस.टी सर्टिफिकेट

प्रो. महेश रघुनाथ महाजन यांचा मुलगा श्री. रोहन महेश महाजन यांना POWER OF ATTORNEY / WILL करून दिलेली असल्याने त्यांना मनपाच्या निविदेत प्रोपरायटर म्हणुन अधिकार देणेबाबत मा. विधी अधिकारी यांचा अभिप्राय घेणेकामी मान्यतेस्तव सादर.

**09/07/2024 06:32 PM**

**Ulhas Keshav Angre**
**CLERK**

---

**Note # 2**

महानगरपालिकेकरिता इंधनासह खाजगी वाहने वाहनचालकासह संपुर्ण सेवा भाडयाने घेणेकामी मे. सिताराम ट्रॅव्हल्स यांची निविदा मंजुर करुन वार्षिक कार्यादेश देण्यात आलेला आहे. सिताराम ट्रॅव्हल्स Sole Proprietary Firm होती. मात्र Proprietor श्री महेश रघुनाथ महाजन यांचे दि.17/06/2024 रोजी निधन झाले आहे. त्यामुळे त्यांचे वारस महेश महाजन यानी सदर महेश रघुनाथ महाजन यांची Sole Proprietary Firm वरील कंत्राट त्यांचे नावे हस्तांतर करणेस दि. 05/07/2024 रोजीचे अर्जान्वये विनंती केली आहे. सोबत श्री महेश रघुनाथ महाजन यांचे Sole Proprietary Firm संबंधीची कागदपत्रे, POWER OF ATTORNEY / WILL व श्री. रोहन महेश महाजन यांचे Sole Proprietary Firm संबंधीची कागदपत्रे सादर केली आहेत.

सदरबाबत मा. विधी अधिकारी यांचे अभिप्राय घेणे आवश्यक आहे. आदेशार्थ सादर.

eSign

**10/07/2024 02:13 PM**

**Dinesh Kailas Kangude**
**ADMINISTRATIVE OFFICER**

---

**Note # 3**

Give legal opinion

**10/07/2024 03:50 PM**

**Sachin Machindra Bangar**
**DEPUTY MUNICIPAL COMMISSIONER**

---

**Note # 4**

वाहन विभागाने प्रस्ताव सादर केलेनुसार मे. सिताराम ट्रॅव्हल्स मालक प्रो. महेश रघुनाथ महाजन यांचा अकस्मात मृत्यु झाल्याने त्यांच्या नावी असलेली मनपाची निविदा श्री.



File No. MBMC-51/149/2024-VECHICLE (Computer No. 632404)
Generated from eOffice by Ulhas Keshav Angre, CLRK(UA)VEHICLE, CLERK, MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION on 05/08/2024 11:53 AM

रोहन महेश महाजन (मुलगा) यांच्या नावी करणेस मान्यता देणेबाबत वाहन विभागाने अभिप्राय अपेक्षिलेले आहेत. त्याअनुषंगाने ॲड. मयुरेश लागू यांच्याकडून अभिप्राय मागविण्यात आला असून सदरचे अभिप्राय Correspondence यादीमध्ये Receipt Page No. 65 – 68 अन्वये जोडत आहे.

eSign

**26/07/2024 01:09 PM**

**Saee Hemant Vadke**
**LAW OFFICER**

---

**Note # 5**

**26/07/2024 05:16 PM**

**Dinesh Kailas Kangude**
**ADMINISTRATIVE OFFICER**

---

**Note # 6**

फेर सादर,

मे. सिताराम ट्रॅव्हल्स मालक श्री. महेश रघुनाथ महाजन यांचा अकस्मात मृत्यु झाल्याने त्यांच्या नावी असलेली निविदा श्री. रोहन महेश महाजन (मुलगा) यांच्या नावी करणेस मान्यता देणेबाबत विधी विभागाचे अभिप्राय मिळणेसाठी दि. 10/07/2024 रोजी प्रस्ताव विधी विभागाकडे पाठविण्यात आला होता.

त्यानुसार विधी अधिकारी यांनी अॅड. मयुरेश लागु यांच्याकडुन अभिप्राय मागविण्यात आलेले होते. सदरचे अॅड. मयुरेश लागु यांनी सदर प्रकरणी दिलेले अभिप्राय Note # 04 सोबत Correspondence Page no. 65 to 68 वर जोडुन पाठविले आहे.

अॅड. मयुरेश लागु यांचे अभिप्राय पाहता श्री. महेश रघुनाथ महाजन यांचे आकस्मात निधन झाल्याने त्यांना मनपाची दिलेली निविदा त्यांचे कायदेशीर वारस श्री. रोहन महेश महाजन यांना हस्तांतर / नियुक्ती करणेस हरकत नसल्याचे अभिप्राय दिले आहेत. तसेच त्याकरिता मनपाचे हित सुरक्षित करण्यासाठी श्री. रोहन महेश महाजन यांचेसमवेत पुरवणी करारनामा करणेसाठी सुचति केले आहे.

तरी श्री. महेश रघुनाथ महाजन यांचा अकस्मात मृत्यु झाल्याने त्यांच्या नावी असलेले काम त्यांचे कायदेशीर वारस श्री. रोहन महेश महाजन, सिताराम ट्रॅव्हल्स यांचे नावे हस्तांतरण / नियुक्ती करणेस मान्यतेस्तव सादर.

**26/07/2024 07:26 PM**

**Ulhas Keshav Angre**

**CLERK**

**Note # 7**

मा. विधी अधिकारी यांचे मार्फत प्राप्त Adv. मयुरेश लागु यांनी सदर प्रकरणी दिलेले अभिप्राय Correspondence Page no. 65 to 68 अवलोकन होणेस विनंती आहे. त्यानुसार मे. सिताराम ट्रॅव्हल्स चे मालक श्री. महेश रघुनाथ महाजन यांचा अकस्मात मृत्यु झाल्याने त्यांच्या नावी असलेले काम त्यांचे कायदेशीर वारस श्री. रोहन महेश महाजन, सिताराम ट्रॅव्हल्स यांचे नावे हस्तांतरण / नियुक्ती करणेस आदेशार्थ सादर.

**29/07/2024 03:22 PM**

**Dinesh Kailas Kangude**
**ADMINISTRATIVE OFFICER**
Digitally Signed

**Note # 8**

Attach the consent of other legal heirs

**31/07/2024 01:27 PM**

**Sachin Machindra Bangar**
**DEPUTY MUNICIPAL COMMISSIONER**

**Note # 9**

मा. उप आयुक्त यांचे निर्देशानुसार अन्य वारसदार यांचे consent घेऊन फेरसादर करावे.

**31/07/2024 01:55 PM**

**Dinesh Kailas Kangude**
**ADMINISTRATIVE OFFICER**
Digitally Signed

**Note # 10**

फेरसादर,

मा. उपायुक्त (वाहन) यांनी नोट क्र. 08 मधील अभिप्रायानुसार वारसदार यांचे **Consent** नोटरी करुन अहवालासोबत जोडलेले आहेत. तरी मे. सिताराम ट्रॅव्हल्स चे मालक श्री. महेश रघुनाथ महाजन यांचा मुलगा श्री. रोहन महेश महाजन यांच्या नावी हस्तांतरण / नियुक्त करणेस मान्यतेस्तव सादर.

REFER NO 69-70

**31/07/2024 04:05 PM**

**Ulhas Keshav Angre**
**CLERK**

**Note # 11**
मे. सिताराम ट्रॅव्हल्स चे मालक श्री. महेश रघुनाथ महाजन यांचा अकस्मात मृत्यु झाल्याने त्यांच्या नावी असलेले काम त्यांचा मुलगा श्री. रोहन महेश महाजन, यांचे नावे करणेसाठी अन्य वारसदार पत्नी व मुलगी यांची ना हरकत सोबत जोडली आहे.
तरी,आदेशार्थ सविनय सादर.

31/07/2024 05:36 PM

Dinesh Kailas Kangude
ADMINISTRATIVE OFFICER
Digitally Signed

---

**Note # 12**

01/08/2024 10:10 AM

Sachin Machindra Bangar
DEPUTY MUNICIPAL COMMISSIONER

---

**Note # 13**
विभागाने मंजुरीनंतर नवीन करारनामा करून घ्यावा

01/08/2024 10:24 AM

KALIDAS RAMRAO JADHAV
CHIEF ACCT & FIN OFFICER
Digitally Signed

---

**Note # 14**
सदर प्रस्ताव लेखापरीक्षण विभागास पाठविण्याचे प्रयोजन समजून येत नाही .

01/08/2024 11:26 AM

Sudhir Krishna Nakadi
MUNICIPAL CHIEF AUDITOR

---

**Note # 15**
For approval

01/08/2024 11:44 AM

Sachin Machindra Bangar
DEPUTY MUNICIPAL COMMISSIONER

---

**Note # 16**

01/08/2024 11:46 AM

ANIKET ARUN MANORKAR



le No. MBMC-51/149/2024-VECHICLE (Computer No. 632404)
enerated from eOffice by Ulhas Keshav Angre, CLRK(UA)VEHICLE, CLERK, MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION on 05/08/2024 11:53 AM

ADDL. COMMISSIONER

**Note # 17**

FOR APPROVAL

01/08/2024 01:30 PM

Sambhaji Shrihari Panpatte
ADDL. COMMISSIONER
Digitally Signed

---

**Note # 18**

प्रस्तावित केले प्रमाणे मान्य

02/08/2024 11:03 PM

SANJAY SHRIPATRAO KATKAR
COMMISSIONER

---

**Note # 19**

03/08/2024 06:27 PM

Sambhaji Shrihari Panpatte
ADDL. COMMISSIONER

---

**Note # 20**

05/08/2024 10:55 AM

Sachin Machindra Bangar
DEPUTY MUNICIPAL COMMISSIONER

---

**Note # 21**

05/08/2024 11:45 AM

Dinesh Kailas Kangude
ADMINISTRATIVE OFFICER

---